# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-४४० ००१ (महाराष्ट्र राज्य)

जा.क्र. मपमविवि/बांधकाम/ ३६२/२०२५ दिनांक : ०१/०७/२०२५

प्रति,

-------------------

-------------------

-------------------

**कामाचे नाव :- महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हयातील तालुका बारामती मधील मौजे कऱ्हावागज गावामधील शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणेकरीता आवश्यक असलेला जागेचे भूमापण करण्यासाठी सल्लागार नेमणूक करणेकरीता..**

वरील विषयास अनुसरुन महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हयातील तालुका बारामती मधील मौजे कऱ्हावागज गावामधील शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणेकरीता आवश्यक असलेल्या जागेचे भूसंपादन जलद गतीने करण्याकरीता व खालील कामे करण्याकरीता खालील भूसंपादन कामी बाबनुसार दर सादर करणेबाबत..

**दर प्रती बाधित शेतकरी प्रमाणे ----**

| अ.क्र. | तपशील | दर % | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| १. | भूसंपादन अधिकारी यांची नेमणूक करणे (CALA)<br>१. गाव नकाशा गोळा करणे.<br>२. गाव नकाशामध्ये प्रस्तावित प्रकल्पाची आखणी करणे.<br>३. आखणी प्रमाणे बाधित गट नंबर चे ७/१२ गोळा करणे.<br>४. महाराष्ट्र शासन निर्णय नुसार परिपुर्ण भूसंपादन प्रस्ताव तयार करणे व जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे जमा करणे.<br>५. जिल्हाधिकारी कार्यालय येथे भूसंपादन अधिकारी यांची नेमणूक करणे कामी Follow-up घेणे. | | १ आठवडा | |
| २. | संयुक्त मोजणी करणे.<br>१.भूसंपादन अधिकारी यांची नेमणूक झाल्यानंतर बाधित गटांचे ७/१२ भूमिअभिलेख बारामती येथे देणे व मोजणी शुल्क ची मागणी करणे.<br>२. भूमिअभिलेख कार्यालयाकडून आलेले मोजणी शुल्क संपादन मंडळाकडून भरुन घेणे.<br>३. शेतकऱ्यांना मोजणीस हजर राहणेकरीता नोटिसेस देणे.<br>४. मोजणी करुन घेत असतांना इतर विभागांना बाधित घटकांचा (सार्वजनिक बांधकाम, mjp, कृषी व इतर) पंचनामा करणे कामी मदत करणे.<br>५. भूमि अभिलेख कार्यालयाकडून मोजमाप पत्रक परिशिष्ट १६ तयार करुन घेणे. | | ३ आठवडे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | बाधित घटकांचे मुल्यांकन करुन घेणे.<br>१. बाधित शेतकऱ्यांच्या जागेची मोजणी करुन घेत असतांना बाधित होणाऱ्या घटकांची मुल्यांकन करणे.<br>२. त्यामध्ये घर, विहीर, बोर वेल, फळझाडे, व इतर संसाधने<br>३. मुल्यांकन करण्याकरीता संबंधित संस्थेला मदत करणे.<br>४. जमिनीची मुल्यांकन करुन घेणे. | | ३ आटवडे | |
| ४. | निवडा तयार करणे व मोबदला रक्कमेचे वाटप करणे करीता शेतकऱ्यांना नोटीस देणे.<br>१. बाधित घटकांचे व जमिनीचे मुल्यांकन आले नंतर त्याचे भूसंपादन अधिकारी यांच्या कडून निवडा तयार करुन घेणे.<br>२. भूसंपादन अधिकारी यांच्या कडून जाहीर केलेल्या दरानुसार बाधित लोकांकडून विहित नमुन्यात देण्यात आलेल्या दरास संमती घेणे.<br>३. तयार झालेला निवडा जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पाठवने<br>४. जिल्हाधिकारी कार्यालय येथून दर मंजुर करुन घेणे.<br>५. दरास मंजुरी मिळालेनंतर शेतकऱ्यांना नोटीस देणे. | | ३ आटवडे | |
| ५. | खरेदी खत करणे व ताबा देणे.<br>१. शेतकऱ्यांना मोबदला नोटीस वाटप झाले नंतर त्यांना कागदपत्र गोळा करण्यासाठी मदत करणे.<br>२. प्रती शेतकरी/गट याप्रमाणे लीगल सर्च (शोध अहवाल) काढणे.<br>३. सर्व कागदपत्रांची सत्यता पडताळणे.<br>४. शोध अहवाल पडताळणी झाले नंतर खरेदी खत करुन घेणे त्यामध्ये आवश्यक असलेले सर्व शुल्क भरणे. | | ३ आटवडे | |
| ६. | ताबा देणे<br>१. खरेदी खत झालेनंतर जमिनीचा ताबा घेणे.<br>२. कजाप करुन घेणे व ७/१२ सदरील नोंद लावणे व त्याकरीता महसूल विभागास मदत करणे. | | खरेदी खताप्रमाणे | |

सोबत खालील दस्तावेज जोडावे.

१) सदर काम केलेल्या एजन्सीचे गेल्या ३ वर्षामधील नमुद शासकीय कामांचे अनुभवन प्रमाणपत्र

२) Income Tax व GST प्रमाणपत्र

३) शासकीय नोंदणी प्रमाणपत्र.

सदर दरपत्रके निम्न स्वाक्षरीकारास दि. ०८ जुलै २०२५ पुर्वी या कार्यालयास पाठवावे.

विद्यापीठ अभियंता,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर

H/letter writing file 1.1.25